रविवार दि.१९ जानेवारी २०२५
हे शब्द आज माझे झाले मुके तरीही !
ते बोलतील भाषा हमखास वादळाची !!
–अ‍ॅड.डॉ विजयकुमार कस्तुरे चिखलीकर

जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ

दैनिक बीड लोकनेता

मुख्यसंपादक : ज्ञानेश्वर बुधवत    संपादक : ज्ञानेश्वर मुंढे

RNI-MAHMAR/2023/89402 Email : elokneta@gmail.com वर्ष : ०२ अंक :१३० किंमत २ रुपये Lokneta News - लोकनेता न्युज 8459977904 epaper.lokneta.in

सुवर्णसंधी...! दैनिक लोकनेता सुवर्णसंधी...!
पत्रकार होण्यासाठी सुवर्ण संधी
दैनिक लोकनेता (जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ)
अल्पावधीतच वाचकांच्या लेखकांच्या पसंतीत उतरलेल्या दैनिक लोकनेता साठी संपूर्ण महाराष्ट्रात जिल्हा, तालुका शहर व गाव पातळीवर प्रतिनिधी नेमणे आहे.अनुभवी व विनाअनुभवी इच्छुकांनी त्वरित संपर्क साधावा !
संपर्क :- संपादक ८४५९९७७९०४

# पालकमंत्र्यांची यादी जाहीर पहिल्यांदाच तीन सहपालकमंत्री



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**मुंबई (वृत्तसंस्था)**

अनेक दिवसांपासून प्रतीक्षेत असलेली पालकमंत्र्यांची यादी अखेर जाहीर झाली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे गडचिरोली जिल्ह्याचं पालकमंत्रिपद असणार आहे. तसेच, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे ठाणे जिल्ह्याचं पालकमंत्रिपद असणार आहेत. तर, अजित पवार यांच्याकडे बीड जिल्ह्यासोबतच पुण्याचीही जबाबदारी देण्यात आली आहे. तर धनंजय मुंडे यांचं नाव पालकमंकत्र्यांच्या यादीतून वगळण्यात आलेलं आहे. तर राज्यात पहिल्यांदाच तीन मंत्र्यांना सहपालकमंत्रीपदे देण्यात आली आहेत.मस्साजोग सरपंच हत्याप्रकरणी वादाच्या भोवऱ्यात सापडल्याने मंत्री धनंजय मुंडे यांना पालकमंत्र्यांच्या यादीतून वगळल्याचे दिसून येत आहे. तर मुंडे यांच्याकडे बीडचे पालकमंत्रीपद देऊ नये, अशी मागणी जनतेकडून केली जात होती. त्यामुळेच बीडचे पालकमंत्रीपद हे उपमुख्यमंत्री अजित पवार यांना देण्यात आले आहे.चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे नागपूर आणि अमरावतीचे पालकमंत्रिपद, राधाकृष्ण विखे पाटील यांच्याकडे अहिल्यानगर, हसन मुश्रीफ यांच्याकडे वाशिम तर गिरीश महाजन यांच्याकडे नाशिक, चंद्रकांत पाटील यांच्याकडे सांगली, गणेश नाईक यांच्याकडे पालघर आणि जळगावचं पालकमंत्रिपद गुलाबराव पाटील यांच्याकडे देण्यात आले आहे.

**कोणाकडे कोणत्या जिल्ह्याची जबाबदारी**


गडचिरोली – देवेंद्र फडणवीस,ठाणे, मुंबई शहर – एकनाथ शिंदे,पुणे, बीड – अजित पवार,नागपूर, अमरावती – चंद्रशेखर बावनकुळे,अहिल्यानगर – राधाकृष्ण विखे पाटील,वाशिम – हसन मुश्रीफ,सांगली – चंद्रकांतदादा पाटील,नाशिक – गिरीश महाजन,पालघर – गणेश नाईक,जळगाव – गुलाबराव पाटील,यवतमाळ – संजय राठोड,मुंबई उपनगर – आशिष शेलार आणि सहपालकमंत्री मंगलप्रभात लोढा,रत्नागिरी – उदय सामंत,धुळे – जयकुमार रावल,जालना – पंकजा मुंडे,नांदेड – अतुल सावे,चंद्रपूर – अशोक उईके,सातारा – शंभूराज देसाई,रायगड – आदिती तटकरे,लातूर – शिवेंद्रसिंह भोसले,नंदुरबार – माणिकराव कोकाटे,सोलापूर – जयकुमार गोरे,हिंगोली – नरहरी झिरवाळ,भंडारा – संजय सावकारे,छत्रपती संभाजीनगर – संजय शिरसाट,धाराशिव – प्रताप सरनाईक,बुलढाणा – मकरंद जाधव पाटील,सिंधुदुर्ग – नितेश राणे,अकोला – आकाश फुंडकर,गोंदिया – बाबासाहेब पाटील,कोल्हापूर – प्रकाश आबिटकर आणि सहपालकमंत्री माधुरी मिसाळ,गडचिरोली – आशिष जयस्वाल सहपालकमंत्री,वर्धा – पंकज भोयर,परभणी – मेघना साकोरे बोर्डीकर

# विद्रुपा धरणाच्या सांडव्यावरील पुलाचे काम मार्गी लागणार

## काम तात्काळ सुरु करण्याचे आ.मनोज कायंदे यांचे निर्देश

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**सिंदखेड राजा । ज्ञानेश्वर बुधवत**



तालुक्यातील धानोरा येथील विद्रुपा लघु पाटबंधारे धरणाच्या सांडव्यावरील पुलाचे काम लवकरच मार्गी लागणार असल्याची माहिती आ मनोज कायंदे यांनी दिली आहे. सदर कामात केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव यांचेही सहकार्य लाभले आहे.

या सांडव्यातील सततच्या पाण्यामुळे परिसरातील नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत होता.स्थानिक आमदार मनोज कायंदे यांनी सदर धरणाच्या सांडव्यावर पुलाची निर्मिती व्हावी यासाठी नागरिकांनी केलेल्या मागणीची दखल घेवून विदर्भ विकास पाटबंधारे महामंडळाच्या अधिकाऱ्यांना याविषयी सूचित केले असून सदर संस्थेने नागरिक,शेतकऱ्यांच्या सुविधेसाठी सांडव्यावरील पुलाच्या कामाला मान्यता दिली आहे.पुढील महिन्यात या विषयीचा प्रस्ताव त्वरेने पाठवण्याचा सूचना देण्यात आल्या आहेत.आमदार कायंदे यांनी सबंधित अधिकाऱ्यांना काम तत्काळ मार्गी लावण्याच्या सूचना दिल्या आहेत.

दरम्यान,याच सांडव्या वरील पुलासाठी शेतकरी पाच,सहा वर्षांपासून लढत आहेत.पुलाच्या मागणीसाठी स्थानिक शेतकऱ्यांनी उपोषणाचा मार्ग देखील अवलंबविला होता.कालव्यातून पाणी सोडता येत नसल्याने शेकडो शेतकऱ्यांचे नुकसान होत होते तर दुसरीकडे आपल्याच शेतात जाण्यास शेकडो शेतकऱ्यांना अडचणीचा सामना करावा लागत होता.आता या पुलाचा प्रश्न मार्गी लागण्यास या भागातील शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळणार आहे.अनेक वर्षांपासूनचा हा प्रश्न सोडविण्यासाठी तत्परता दाखवल्याबद्दल या प्रश्नाचा पाठपुरावा करणारे बळीवंश लोकचळवळीचे श्री नितीन कायंदे, शरद कायंदे, अशोक मोगल,खरात, दत्ता मांटे, अरुण पाखरे, वायाळ तथा धानोरा वासीय शेतकरी व चांगेफळ, रूम्हना, तांदुळवाडी, सोयंदेव परिसरातील शेतकऱ्यांनी समाधान व्यक्त केल.

## ६० हजार रुपये लाच स्वीकारणारा

# भूमी अभिलेख कार्यालयातील सानप लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या ताब्यात

## सानप यांनी केली होती ८० हजाराची मागणी

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**लोणार । ज्ञानेश्वर बुधवत**

दि. १७ जाने रोजी लोणार –स्थानिक भूमी अभिलेख कार्यलयात कार्यरत लोकसेवक उमेश पंडीतराव सानप , वय ३९ वर्ष, पद– भुकरमाफक उपअधीक्षक कार्यालय रा. खटकेश्वर नगर लोणार,यांनी तक्रारदार यांच्या कडून तडजोडीअंती ६०हजार रुपये लाच स्वीकारताना लाचलुचपत प्रतिबंधक विभाग बुलडाणा यानी माऊली गजानन हॉटेल बसस्थानका जवळ साफळा रचून रंगेहाथ पकडल्याची घटना दि. १७ जानेवारी रोजी घडल्याने एकच खळबळ उडाली.



यातील तक्रारदार यांनी प्लॉटची आखणी व मोजणी लवकर करण्यासाठी लोकसेवक हे ८० हजार रुपये मागणी करीत असल्याची तक्रार लाच लूचपत विभाग बुलढाणा यांच्याकडे प्राप्त झाली होती.१७ जानेवारी रोजी लाच पडताळणी कारवाई आयोजीत केली असता.भुकरमाफक उमेश सानप यांनी तक्रारदार यांना ८० हजार रुपये लाचेची मागणी करून लाचेचा पहिला हप्ता ६० हजार रुपये स्वीकारण्यास समती दर्शवून उर्वरित २० हजार रुपये काम झाल्यावर स्वीकारण्याचे मान्य केले.आयोजित साफळा कारवाई दरम्यान लोकसेवक उमेश सानप यांना पंचासमक्ष लाचेचा पहिला हप्ता ६० हजार रुपये घेताना रंगेहात पकडण्यात आले.लोकसेवक यांना ताब्यात घेऊन त्यानंच्या विरुद्ध लाच मागणी बाबत लोणार पोलीस स्टेशन येथे कलम ७ भ्रष्टाचार प्रतिबंध अधीनियम१९८८ प्रमाणे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु होती.सदर कार्यवाही ही मारुती जगताप, पोलीस अधिक्षक, अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो, अमरावती, परिक्षेत्र अमरावती, सचिद्र शिंदे अप्पर पोलीस अधिक्षक, अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो, अमरावती, परिक्षेत्र अमरावती यांचे मार्गदर्शनाखाली सापळा अधिकारी श्रीमती शितल घोगरे,पोलीस उपअधीक्षक,साफळा पोलीस निरीक्षक रमेश पवार,साफळा मदत पथक सफौं. श्याम भांगे,पोहेका,प्रवीण बैरागी,जगदीश पवार, विनोद लोखंडे,रंजीत व्यवहारे,शैलेश सोनवणे,नितीन शेटे यांनी पार पाडली.






जगद्गुरू रामानंदचार्य नरेंद्रचार्य यांच्या भक्तगणांनी आज भव्य रक्तदान शिबीर आयोजित केले होते त्यावेळी. पोलीस स्टेशन सिंदखेड सहाय्यक पोलीस निरीक्षक श्री जाधव सर यांनी मोजे सारखणी येथे महा कुंभ रक्तदान शिबिरास उपस्थित राहून श्री पवार सर या दात्यास प्रमाणपत्र देऊन यांचा सत्कार करण्यात आला. (लोकनेता न्युज नेटवर्क माहुर)




# महास्वामित्व योजनेअंतर्गत पळसखेड चक्का,व गुंज येथे घरमालकांना मालमत्ता कार्डचे सनदचे वाटप

## उपविभागीय अधिकारी प्रा.खडसे यांच्या मार्गदर्शनाखाली सनदचे वाटप

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**सिंदखेड राजा । ज्ञानेश्वर बुधवत**



ग्रामविकास विभाग, भूमी अभिलेख विभाग तथा भारतीय सर्वेक्षण विभाग यांच्या संयुक्त विद्यमानाने महास्वामित्व योजना अंतर्गत महाराष्ट्र राज्यातील गावांचे गावठाणातील मालमत्तांचे ड्रोन द्वारे सर्वेक्षण करण्यात येऊन मालमत्तांचे प्रमाणबद्ध नकाशे तयार झालेले असून संबंधित मालमत्तांच्या मालकी हक्कांबाबत शासकीय पुरावा अर्थात सनद तयार करण्यातआलेल्या आहेत. त्या अनुषंगाने दिनांक १८ जाने २०२५ रोजी दुपारी १२:३० वाजता मा. पंतप्रधान यांच्या हस्ते महास्वामित्व योजनेअंतर्गत भारतभरात आज ५० लाखाहून अधिक घरमालकांना मालमत्ता कार्डचे / सनदचे वाटप करण्यात येत आहे.

त्यानुसार सिंदखेड राजा चे मा. उपविभागीय अधिकारी प्रा. संजय खडसे यांच्या मार्गदर्शनाखाली आज सिंदखेड राजा तालुक्यातील पळसखेड चक्का आणि गुंज या दोन गावांमध्ये सनद प्रमाणपत्र वाटप करण्यात आले. तसेच या सर्व सनद वाटपावर नियंत्रण अधिकारी म्हणून मा. तहसीलदार अजित दिवटे, मा. गट विकास अधिकारी मुकेश महोर, मा. उपअधीक्षक भूमि अभिलेख सिंदखेड राजा साळूबा वेताळ, मा.नायब तहसीलदार डॉ. प्रवीणकुमार वराडे यांनी काम पाहिले. पळसखेड चक्का येथे आज मा. उपविभागीय अधिकारी प्रा. संजय खडसे यांच्या हस्ते नागरिकांना सनद वाटप करण्यात आली आहे सोबत,साळूबा वेताळ,डॉ. प्रवीणकुमार वराडे, भास्कर घुगे, नरेंद्र इंगोले, श्रीमती सुनिता खडसे, श्रीमती कविता नागरे, प्रकाश शिंदे,प्रवीण कुलकर्णी, सय्यद शोयब, सरपंच शिवानंद मुंढे, उपसरपंच उत्तम खजूरे, संतोष मुंढे, शिवानंद वैद्य तसेच ग्राम पंचायत सदस्य आणि गावातील नागरिक उपस्थित होते.तसेच तालुक्यातील दुसरी टीम ही गुंज येथे पाठवण्यात आली होती. या टीम मध्ये भूमी अभिलेख कार्यालयातील मारोती थोरवे, गोपाल वाघमारे, श्रीकांत बुलबुले, आयुष नायगावकर तसेच गुंज गावचे सरपंच श्रीमती नंदाताई सुरेश तुपकर, ग्राम पंचायत अधिकारी अर्जुन गवई, विस्तार अधिकारी पवार, तसेच गावातील सर्व ग्राम पंचायत सदस्य, नागरिक उपस्थित होते.

# हिंडनबर्ग रिसर्च आणि अदाणी

# यशस्वी कारकीर्द आणि स्वार्थाचा संघर्ष!

## हिंडनबर्ग रिसर्च बंद करण्याचा निर्णय काय सांगतो?

लोकनेता न्यूज नेटवर्क

नेथ अँडरसन यांनी १५ जानेवारी २०२५ पासून हिंडनबर्ग रिसर्च बंद करण्याचा निर्णय घेतल्यावर त्यांनी सांगितलेली एक महत्त्वाची भावना – यशस्वी कारकीर्द कधी कधी स्वार्थी कृत्य ठरते – आर्थिक क्षेत्रातील मानवी भावनांचा वेध घेतो. यश, पैसा आणि प्रतिष्ठेच्या मागे धावताना वैयक्तिक शांतता, समाधान आणि कुटुंबासोबतचा वेळ यांचा त्याग होतो. विशेषतः जेव्हा अशा कारकीर्दीचा भाग मोठ्या शक्तिशाली कॉर्पोरेट्सना आव्हान देणे आणि मूल्य आधारित वित्तीय कार्य असते, तेव्हा त्या संघर्षाचे स्वरूप अधिक तीव्र आणि वैयक्तिक बनते.

**अदाणी समूहासोबत संघर्ष:**

अदाणी समूह आणि हिंडनबर्ग यांच्यातील संघर्ष हे भारताच्या आर्थिक इतिहासातील सर्वात मोठे आणि चर्चेतले प्रकरण ठरले आहे. २०२३ मध्ये हिंडनबर्गने अदाणी समूहावर शेअर बाजारातील हेराफेरी, आर्थिक गैरव्यवहार आणि परदेशी गुंतवणूक व्यवस्थापनाचे गैरवापर यावर सविस्तर संशोधन अहवाल प्रसिद्ध केला होता. यामुळे अदाणी समूहाला अब्जावधी डॉलर्सचे नुकसान झाले आणि त्यांची प्रतिष्ठा व व्यवसाय मॉडेल तपासणीच्या भोवऱ्यात आले. मात्र अदाणी समूहाच्या दृष्टीने, हिंडनबर्ग रिसर्च बंद होणे हा एक दिलासा असू शकतो, कारण त्यांच्या सर्वात कठोर टीकाकाराने बाजारातून माघार घेतली आहे. तथापि, हा निर्णय एकच प्रश्न उभा करतो – आरोपांचे उत्तर न देता टीकाकार गप्प झाला तरी सत्य गप्प होईल का?

**नेथ अँडरसनचा विचार:**

नेथ अँडरसन यांनी सांगितले की, त्यांचा बंद करण्याचा निर्णय कोणत्याही दबावामुळे नव्हता, तर तो एक वैयक्तिक निवड होती. एका यशस्वी पण मानसिक ताणतणावाने भरलेल्या प्रवासानंतर त्यांनी स्वतःच्या शांतीसाठी माघार घेतली. हे त्यांचे विधान केवळ वित्तीय क्षेत्रापुरते मर्यादित नाही, तर जगभरात यश मिळविणाऱ्या प्रत्येकाला लागू होते. जिथे यश मिळवण्यासाठी कुटुंब, वेळ आणि आरोग्याचा त्याग करावा लागतो, तेथे नंतर स्वतःसाठी वेळ काढणे आवश्यक ठरते.

**आर्थिक क्षेत्रातील भावनिक ओळख:**

फायनान्स आणि गुंतवणूक क्षेत्रात मानसिक दबाव, जोखीम घेण्याची तयारी, आणि संघर्षाचे ताणतणाव प्रचंड असतात. हिंडनबर्गसारखी कंपनी, जी प्रस्थापित उद्योगपतींना आव्हान देते, तिथे धोके आणि वैयक्तिक त्रास जास्त असतो. यशस्वी कारकीर्दीने संधी दिल्या तरी ताणतणाव आणि मानसिक थकवा यांवर मात करण्यासाठी वेळ काढणेही गरजेचे ठरते.

**अदाणी समूहाला मिळालेले धडे:**

हिंडनबर्ग रिसर्चच्या आरोपांनंतर अदाणी समूहाला अनेक महत्त्वाचे धडे मिळाले. त्यांना पारदर्शकता आणि उत्तरदायित्वाच्या बाबतीत सुधारणा करण्याचे महत्त्व समजून आले, तसेच जोखीम व्यवस्थापन धोरणे अधिक प्रभावी बनवली. समूहाने गुंतवणूकदारांसोबत चांगला संवाद साधण्यावर भर दिला आणि आंतरराष्ट्रीय नियामकांचे पालन सुनिश्चित केले. प्रतिमेचे व्यवस्थापन, संस्थात्मक नियंत्रण, आणि वैधानिक सल्लागारांचा प्रभावी वापर करण्याची गरज त्यांनी अनुभवली. भविष्यकाळात आरोपांवर तत्परतेने आणि तथ्यांवर आधारित उत्तर देण्याची तयारी ठेवून, त्यांनी व्यवसाय प्रक्रियेत सुधारणा केली. या सर्व धड्यांमुळे अदाणी समूहाला दीर्घकालीन विश्वासार्हता आणि सततच्या विकासासाठी दिशा मिळाली आहे.एकूणच, नेथ अँडरसन यांचे विधान आणि हिंडनबर्ग रिसर्चचा बंद होण्याचा निर्णय कॉर्पोरेट व्यवस्थापन, बाजार नियमन आणि गुंतवणूकदार जागरूकता यांना नवी दिशा देतो. यशस्वी कारकीर्द म्हणजे केवळ वैयक्तिक लाभासाठी नव्हे तर सामाजिक मूल्यांनाही योगदान देणारी असली पाहिजे. अदाणी समूह या संघर्षातून काय शिकतो आणि भविष्यात कोणत्या सुधारणा करतो, हे पुढे जाऊन महत्त्वाचे ठरेल.लेखक डॉ. भारत कऱ्हाड हे चार्टर्ड अकाउंटंट असून सध्या ते वराडकर महाविद्यालय दापोलीचे प्राचार्य आहेत.

**–डॉ.भारत कऱ्हाड**

## लोहा तालुक्यात १ हजार ३०२ विद्यार्थ्यांनी दिली नवोदय परीक्षा बिईओ व्यवहारे यांची माहिती



लोकनेता न्यूज नेटवर्क

**लोहा । विशाल घंटे**

लोहा तालुक्यात १हजार ३५१ विद्यार्थ्यां पैकी १ हजार ३०२ विद्यार्थ्यांनी नवोदय विद्यालय प्रवेश परीक्षा दिली .चार परीक्षा केंद्रावर ही परीक्षा सुरळीत पार पडली अशी महिती गटशिक्षणाधिकारी सतीश व्यवहारे यांनी दिली

लोहा तालुक्यात नवोदय विद्यालय प्रवेश परीक्षा शहरातील चार परीक्षा केंद्रावर शनिवारी १८ जानेवारी रोजी सुरळीत पार पडली. लोहा शहरातील श्री संत गाडगे महाराज विद्यालयाच्या परीक्षा केंद्रावर ४०८ विद्यार्थी परीक्षेला बसले होते पैकी ३९३ विद्यार्थी उपस्थित होते.कै. विश्वनाथराव नळगे विद्यालयात ४०८ विद्यार्थ्यां पैकी ३९३ विद्यार्थ्यांनी उपस्थिती होती .नारायणा इंग्लिश स्कुल केंद्रावर ४०८ पैकी ३९५ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली तर ग्लोबल इंग्लिश स्कुल या शाळेत १३७ पैकी १२१ विद्यार्थी उपस्थित होते .सुरळीत परीक्षा पार पडली.१ हजार ३५१ विद्यार्थी परीक्षेला बसले होते पैकी १ हजार ३०२ विद्यार्थी उपस्थित होते तर ४९ विद्यार्थी गैरहजर होते. गटशिक्षणाधिकारी सतीश व्यवहारे यांनी सुरळीत परीक्षा पार पाडण्यासाठी नियोजन केले होते

शिक्षण विस्तार अधिकारी सरस्वती आंबलवाड, अंजली कापसे, बापूराव फसमले, डी आर शिंदे हे विस्तार अधिकारी परीक्षा केंद्रावर ठाण मांडून होते तसेकॅब , केंद्रप्रमुख जी एस मंगनाळे, डी.व्ही.मोहिते, संतोष जोशी, यांनी परिश्रम घेतले.

## श्रमाशिवाय कोणतेही गाव विकसित होत नाही-डॉ.यशपाल भिंगे यांचे मत

लोकनेता न्यूज नेटवर्क

**नायगाव । माधव बैलकवाड**




ग्रामीण भागातील काही लोक शहराकडे वळत आहेत म्हणून शहरे ही हत्ती पायासारखे फुगत आहेत तर खेडे मात्र ओस पडत आहेत, सरकारला स्मार्ट सिटी पाहिजे तर मग गाव का नको, असा प्रश्न करीत आपल्या जन्मभूमीत आपणास बरेच काही करता येते फक्त आपल्यात जिद्द असावी, कारण श्रमाशिवाय कोणतेही गाव विकसित होत नाही असे प्रखड मत प्रसिद्ध विचारवंत डॉ. यशपाल भिंगे यांनी राष्ट्रीय सेवा योजना शिबिर मध्ये व्यक्त केले.

एज्युकेशन सोसायटी नायगाव संचलित शरदचंद्र वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाच्या वतीने तालुक्यातील मौजे परडवाडी येथे राष्ट्रीय सेवा योजना विशेष वार्षिक शिबिर या आयोजित कार्यक्रमात अध्यक्षस्थानी सदर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉक्टर के हरि बाबू, प्रमुख व्याख्याते डॉक्टर यशपाल भिंगे गावच्या सरपंच सौ संगीताताई परडे शरदचंद्र महाविद्यालयाचे प्रोफेसर डॉ.बलभीम वाघमारे प्रोफेसर डॉ. श्रीरंग वट्टमवार प्रा. डॉ. प्रफुल कुलकर्णी, प्रा. डॉ. एन.पी सानप, प्रा. डॉ. सिद्दिकी, प्रा. डॉ. अजनीकर, डॉक्टर शिंदे मॅडम , डॉ .सौ महानंदा राऊत खेडकर, प्रा एम.एच पांगरकर, प्रा. डॉ. बी आर कोकलवार, प्रा.डॉ.साईनाथ वाघमारे, प्रा. डॉ. पी.जी धुमाळे, प्राध्यापक बालाजी गायकवाड, प्रा. डॉ. मारुती शिंदे, प्रा. हनुमंत हांडे, यांची प्रमुख उपस्थिती होती. डॉक्टर भिंगे बोलताना पुढे म्हणाले की, राष्ट्रपुरुष कोण्या जातीत जन्मले म्हणून त्यांना आपण फालो करतो पण त्यांच्या विचारावर हा देश चालतो जातीपेक्षा विचार मोठे आहेत पण आज वाईट गोष्टीचा स्वीकार होत आहे तर चांगल्या गोष्टीला तिरस्कार मिळत आहे म्हणून आपल्या उद्धारासाठी जिजाऊ माता सावित्रीबाई फुले महाराणी ताराराणी या अत्यंत महत्त्वाच्या ठरतात फिल्मी अभिनेत्री पादुका कोण नाही असे सांगत त्यांनी राष्ट्रसंत गाडगेबाबा यासह राष्ट्र पुरुषांची ज्वलंत उदाहरणे विद्यार्थी व गावकऱ्यासमोर मांडली.यावेळी दशरथ पाटील कौटकर,शेषराव पाटील कराळे, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. मारुती कदम, प्रा. डॉ.पि.डी तावडे, नोडल ऑफिसर साईगणेश यादव व गावातील नागरिक आणि सदर महाविद्यालयाचे विद्यार्थी विद्यार्थिनी यांची उपस्थिती होती सदर कार्यक्रमांचे सूत्रसंचालन प्राध्यापक डॉक्टर गो.रा परडे यांनी तर आभार प्रा. बालाजी गायकवाड यांनी मानले.

शरदचंद्र महाविद्यालयातील विद्यार्थी विद्यार्थिनी यांनी आपल्या परिश्रमातून गावासाठी बरेच काही देणार आहेत गावकऱ्यांनी ते अंगीकृत आपल्या गाव स्वच्छता साठी आपणही पावले उचलावी,असे अध्यक्ष भाषणातून प्राचार्य डॉ के हरीबाबू यांनी विचार व्यक्त केले.

## कुटुंब वत्सल,समाजहितैषी वैजनाथ गुंडाप्पा मठपती जीवनगौरव पुरस्काराने सन्मानित

लोकनेता न्यूज नेटवर्क

उस्माननगर येथील सर्वांचे आवडते वैजनाथ गुंडाप्पा मठपती महाराज यांना जीवनगौरव पुरस्काराने शनिवारी दि. १८ जानेवारी रोजी मान्यवरांच्या उपस्थितीत सपत्नीक शाल, श्रीफळ,वस्त्र आहेर, सन्मानपत्र,स्मृतीचिन्ह पुष्पहाराने सन्मानित करण्यात आले. अध्यक्षस्थानी माजी मुख्याध्यापक श्यामसुंदर जहागीरदार होते.

एका व्रतस्थ जीवन जगताना समाज हितासाठी झटणारे व्यक्तीमत्व म्हणून वैजनाथ मठपती महाराजांच्या कार्याची गावात तसेच परिसरातील अनेक गावांत विशेष ओळख आहे.

वैजनाथ महाराज मठपती यांना कै. ना. ग. पांडे , लाटकर , वैद्यकीय ट्रस्ट नांदेड, या संस्थेच्या वतीने दिला जाणारा कै. भास्कर नागोराव लाटकर यांच्या स्मृतिप्रित्यर्थ दरवर्षी दिला जाणारा जीवन गौरव पुरस्कार शनिवारी दि. १८ जानेवारी रोजी दुपारी समता विद्यालयाच्या प्रांगणात हा पुरस्कार देवून सपत्नीक गौरव करण्यात आला. या बद्दल त्यांच्या जीवनकार्याचा संक्षिप्त आढावा.

वैजनाथ महाराज मठपती यांचा जन्म जंगम कुळातील अतिशय गरीब घरात झाला. उदरनिर्वाहासाठी परंपरेने देवपूजा करणे,कोरान्नभिक्षा, नैवेद्य ताट, झोळी यावरच चालत असे. अशा कुटुंबात जन्मलेल्या वैजनाथ मठपती महाराज यांचे बालपण कुणाचेही हृदय हेलावून जावे असे होते. गावातील शाळेत केवळ चौथ्या इयत्तेपर्यंत शिक्षण घेतलेल्या महाराजांच्या जीवनातील मनाला पिळवटून टाकणारी घटना घडली. वयाच्या अकराव्या वर्षी त्यांचे वडील गुंडाप्पा मठपती यांचे निधन झाले .वडिलांचे अंतिम संस्कार करून घरी परत आल्यानंतर त्याचदिवशी आई गिताबाई यांचे निधन झाले. लहान वयातच महाराजांवर दुःखांचा डोंगर कोसळला. महाराजांच्या लहान वयात खेळण्याचे बागडण्याचे वय असताना स्वतःची जबाबदारी स्वतः सांभाळण्याची वेळ १९४४ वर्षी जन्मलेल्या वैजनाथ महाराज यांच्यावर आली. आई–वडिलांचे छत्र हरवल्यानंतर या कुटुंबाला गावकऱ्यांनी वाऱ्यावर न सोडता आश्रय, आधार दिला. या कालावधीत दोन वर्षाचा खडतर वनवास भोगावा लागला.

१९५८ व्या साली वयाच्या पंधराव्या वर्षी महाराजांचे सुनेगाव येथील सुमनबाई यांच्यासोबत लग्न झाले. त्यावेळी घरात फक्त पायलीभर ज्वारीचे पीठ ,थोडीफार तुरदाळ होती मोठ्या कष्टाने संसाराचा गाडा पतीपत्नी यांनी सुरू केला. कोवळ्या वयात जबाबदारी पेलताना वसमतचे गुरु महाराज यांच्या सानिध्यात राहून कुलपरंपरेला आवश्यक असे रुद्र , अभिषेक , पंचांग यांचे ज्ञान अवगत केले . गावातील कै. संभा पाटील घोरबांड ,मुन्शी यांच्या समवेत विविध पोथ्या पुराणांचे वाचन करून ओवीचा अर्थ सांगण्याचे कार्य जवळपास ६० वर्ष केले .

देवाचे नामस्मरण होण्यासाठी संध्याकाळी गावातील वीरशैव समाजातील लोकांना एकत्रित करून भजनांची गोडी घरातील ओसरीवर लावली. त्यावेळी कै. कोंडीबा साखरे , कै. गणपतराव ईसादकर , भगवान आगाशे , व्यंकटराव कऊटकर , यांच्या समवेत अन्य टाळकरांच्या उपस्थितीत वीरशैव भजनाची सुरुवात केली.

१९९२ मध्ये कै. सूर्यभान पाटील घोरबांड , कै . श्रीरंग उत्तरवार यांच्यासोबत पाच वेळेस चारधाम यात्रा केली.



वैजनाथ महाराजांनी शिराढोण येथील हप्पया स्वामी महाराज, सांब शिवाचार्य महाराज वसमतकर , सिद्दलिंग शिवाचार्य महाराज साखरखेर्डा कर, वैरागकर , ईश्वर शिवाचार्य महाराज , षडाक्षर शिवाचार्य महाराज शिराढोणकर , डॉ.शिवलिंग शिवाचार्य महाराज अहमदपूरकर , यांच्या सानिध्यात पंचांग ,भविष्य , धार्मिक विधीचे ज्ञान अवगत केले.

गावातील तत्कालीन सरपंच वैजनाथ पाटील घोरबांड, तुकाराम वारकड गुरूजी यांनी वीरशैव समाजासाठी गावठाण ची जागा उपलब्ध करून देताना वैजनाथ मठपती यांनी त्यावेळी स्वतःचे पाच हजार रुपये देऊन जागा समाजाला मिळवून दिली. आज या जागेवर भव्य शिव मंदिर उभारण्यात आले आहे. राम वारकड गुरुजी, विठ्ठलराव इसादकर व सर्व लिंगायत व वीरशैव मंडळींनी पुढाकार घेवून सभामंडप,प्रशस्त मंदिर उभे केले आहे त्याचे वटवृक्षात रूपांतर झालेले पहावयास मिळत आहे.

चारधाम यात्रा करीत असताना वैजनाथ महाराज केदारनाथ येथे आठ ते दहा दिवस मुक्कामासाठी होते. त्यावेळी सिध्द पुरूष , असलेल्या एका तपस्वी विभूतीनी महाराजांना वाचा सिध्दी आशिर्वाद दिला. वैजनाथ महाराज यांचे जीवन एखाद्या वृतस्थ योग्यासारखे आहे. त्यांनी वयाच्या साठ वर्षापर्यंत दररोज पहाटे ब्रह्म मुहूर्तावर स्नान , पुजा अर्चा , हा नित्य नियमाने परिपाठ, हा त्यांचा दिनक्रम होता.

कुटुंबात पत्नी,दोन मुली, दोन मुलांना उत्तम संस्कारांची व आदर्श जीवनशैली शिकवण देऊन त्यांनी ज्या वेदना सहन केल्या त्या आपल्या मुलाबाळांना होऊ नये म्हणून उच्च शिक्षाविभुषित केल. मुलांना कठोर शिस्त, संस्काराच्या छायेखाली वाढवून आपण समाजाचे काहीतरी देणे लागतो या उदात हेतूने महाराजांनी योग्य शिक्षण देवून

दोन्ही मुले शासकीय सेवेत पाठवली. यात मोठा मुलगा ग्राम विस्तार अधिकारी पदावरून काही महिन्यापूर्वी सेवानिवृत्त सुद्धा झाला तर लहान मुलगा जिल्हाधिकारी कार्यालयात मोठ्या पदावर कार्यरत आहे .सुना , नातू , नातवंड उच्च शिक्षण घेऊन सर्वांनी महाराजांचे नाव उज्वल केले आहे.

आज वैजनाथ मठपती महाराज यांनी संजिवन समाधी असलेल्या श्री गुरू नागय्या स्वामी महाराजांच्या मंदिराचे स्वतः पुढाकार घेऊन जिर्णोद्धाराचे काम पूर्ण करीत आहेत. शिराढोण येथील भिमाशंकर महाराज,कलंबर येथील आगडम बुवा व श्री गुरू नागय्यास्वामी हे समकालीन सिद्ध पुरुष म्हणून ओळखले जातात.विशेष म्हणजे श्री गुरू नागय्यास्वामी यांची संजिवन समाधी गावात जागृत देवस्थान म्हणून ओळखली जाते.

भविष्य,पंचाग,संख्याशास्त्राद्वारे वैजनाथ महाराजांनी अनेक जनांना आत्मविश्वास,मायेचा आधार दिला आहे.परिसरातील अनेक कुटुंब महाराजांच्या कार्याविषयी खूप आदराने बोलताना दिसतात.

महाराज व सुमनबाई यांचे परिपूर्ण जीवन पाहून साक्षात शंकर पार्वती जोडी पाहत असल्याच्या मनस्वी भावना त्यांच्या भेटीत भक्त मंडळी व्यक्त करतात. प्रत्येकाचे आई–वडिल हेच पृथ्वीतलावरील साक्षात भगवंताचे रुप असल्याची भावना त्यांच्या कुटुंबातील सदस्य प्रांजळपणे व्यक्त करतात व स्वतः सेवा करून कृतीतून दाखवून देतात हे सर्वांसाठी प्रेरणादायी उदाहरण ठरेल असे आहे.

अतिशय समाधानी व आनंदी जीवन जगत असताना पूर्वी अनुभवलेल्या काळाची , भाकरीची जाणीव सांभाळावी. पूर्वी लोक खूप माणुसकीने , आपुलकीने , प्रेमाने वागत , हलाखीच्या परिस्थितीत एकमेकांना आधार देत असत. आज मी खूप समाधानी आहे. सर्वांच्या हितातच आपल्या सर्वांचे हित आहे.समाजासोबत राहून समाजासाठी जगणे आज काळाची गरज असल्याची वैजनाथ महाराज मठपती यांनी मनातील भावना व्यक्त केली . अशा सर्वांच्या आदरास पात्र ठरलेल्या व्यक्तिमत्वाला जीवनगौरव पुरस्काराने आज मान्यवरांच्या उपस्थितीत गौरविण्यात आले . त्याबद्दल त्यांचे महाराजांच्या उभयतांच्या चरणी साष्टांग नमस्कार अभिनंदन व पुढील दिर्घायुष्य लाभो हीच प्रार्थना .

**–गणेश लोखंडे,उस्माननगर**


## भोकर तालुक्यातील प्रशासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या नावात बदल

# आता स्वातंत्र्य सेनानी डॉ.दासराव साकळकर प्रशासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था म्हणून ओळखल्या जाणार

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**भोकर । रमाकांत जोशी**





राज्य शासनाने कौशल्य रोजगार उद्योजकता व नाविन्यता विभाग यांच्या मार्फत शासन निर्णय काढून राज्यातील १३२ शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांचे नावे बदलण्यास मान्यता देण्यात आली त्याच भोकर येथील औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत स्वातंत्र्य सेनानी डॉक्टर दासराव साखळकर यांचे नाव देण्यात आले

१५ ऑगस्ट रोजी भारत स्वतंत्र झाला असला तरीही मराठवाडा हा निजामाच्या जुलमी राजवटीतच होता निजामाच्या द्वारा होणारा अत्याचाराच्या विरोधात स्वामी रामानंद तीर्थ यांनी हैदराबाद मुक्ती लढा उभा केला त्यात भोकर परिसरातील डॉक्टर दासराव साकळकर तसेच अन्य कार्यकर्त्यांनी सहभाग नोंदविला होता भोकर शहरातील दत्त गडावरील मुस्लिम अतिकमण मुक्त करून महादेव मंदिराची पूर्णस्थापना तसेच स्वातंत्र सैनिकाची लागणारे शस्त्रासाठी रक्कम जमा करण्यासाठी उमरी बँक लुटण्याचे अभियान यासारखे अभियानात त्यांनी भाग घेतला त्यांच्या व अनेक स्वातंत्र सैनिक लोकांनी दिलेल्या लढ्यामुळे दिनांक १७ सप्टेंबर २०४६ रोजी मराठवाडा जुनी निजामाच्या राजवटीतून मुक्त झाला त्यानंतर त्यांनी आपली वैद्यकीय सेवा समाज सेवेचे कार्य अखंडितपणे चालू ठेवले तसेच भोकर शहरात श्री भुंजगराव किन्हाळकर यांनी डॉ . दासराव साकळकर यांना सोबत घेवून दिगंबरराव बिंदू महाविद्यालयाची स्थापना केली . तसेच ते अभिनव शिक्षण संस्था चे संस्थापक सदस्य होते . अशा या महान स्वातंत्र सेनानींचे कार्य हे नेहमीच प्रेरणादायी असते आणि ते आपल्या पुढील पिढीस माहीत असावे त्यांना अशा महान स्वातंत्र सैनिकांची ओळख असावी .

राज्यात शासकीय व खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्था मार्फत आय टी आय शिल्प कारागीर प्रशिक्षण योजनेअंतर्गत सी टी एस प्रशिक्षण देण्यात येते या योजनेच्या मुख्य उद्देश हा युवकांना रोजा रोजगार भीमा भुमुख प्रशिक्षण देऊन त्यांना रोजगार व स्वयंरोजगारासाठी सक्षम बनविणे व खाजगी औद्योगिक आस्थापनांना लागणाऱ्या कुशल मनुष्यबळाचा पुरवठा करणे असा आहे सध्या परिस्थितीत राज्यात ४१९ शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था व ५८५ खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्था कार्यरत आहेत त्यानुसार भोकर येथील औद्योगिक प्रशिक्षण संस्थेला डॉक्टर दासराव साकळकर यांचे नाव देऊन त्यांच्या कार्याचा सन्मान केला असल्याचे भोकर शहरातून महाराष्ट्र शासनाचे विशेष आभार मानल्या जात आहेत.

# देगलूर येथे अल्पसंख्याक शिवसेना (उबाठ) पक्ष प्रवेश सोहळा संपन्न

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**देगलूर । जयपाल दावनगीरकर**



देगलूर शहरातील अल्पसंख्याक समाजात सार्वजनिक ठिकाणी शिवसेना (उबाठ) नांदेड जिल्हा संपर्कप्रमुख बबनराव थोरात, जिल्हा प्रमुख भुजंगराव पाटील डक, अल्पसंख्यांक सेनेचे जिल्हा प्रमुख जैनोद्दीन पटेल रावणगांवकर, उपजिल्हाप्रमुख महेश पाटील यांच्या आदेशाने अल्पसंख्याक सेना आघाडीच्या शहर कार्यकारिणीच्या बैठकीत निवड करण्यात आली.

यावेळी शेख गौस प्यारे मियां यांची शहराध्यक्ष पदी व सय्यद मीर सय्यद हनुमिया यांची शहर उपाध्यक्ष पदी निवड शिवसेना नांदेड जिल्हा संपर्कप्रमुख बबनराव थोरात साहेब, जिल्हा प्रमुख भुजंगराव पाटील डक,अल्पसंख्याक सेनेचे जिल्हा प्रमुख जेनौद्दीन पटेल रावणगावकर यांच्या आदेशाने करण्यात आली. या वेळी शिवसेना उपजिल्हाप्रमुख महेश पाटील, देगलूर शिवसेना उपशहरप्रमुख संजय जोशी, बाबुराव मिनकीकर, अल्पसंख्याक सेना तालुका प्रमुख युसुफ भाई मिस्त्री युवा सेना शहर समन्वयक संतोष कांबळे आदी उपस्थित होते. यावेळी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ सुनील जाधव हाळीकर यांनी केले यावेळी उपस्थित मोहसीन इस्माईल मियां , उबेद हुसेन शेख, क्लिक गौस महोमंद, इस्माईल गौस ,सलून पटेल,जुनेद खय्युम मिया, बासिद मोईनशेख, इब्राहिम गौस शेख, शेरखान मियां, सय्यद मियां, सुमेर सय्यद आदींसह असंख्य युवकांनी (उबाठ) शिवसेनेत प्रवेश केला यावेळी या सर्वांचा भगवी दस्ती व पुष्पहार घालून सत्कार करण्यात आला.

# कावळगाव येथे यश पेट्रोल पंपाचे सेवानिवृत्त उपजिल्हाधिकारी कांबळे यांच्या हस्ते संपन्न

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**देगलूर । जयपाल दावनगीरकर**



देगलूर तालुक्यातील मौजे काळगाव येथे हिंदुस्तान पेट्रोलियम कार्पोरेशन लिमिटेड कंपनीच्या यश पेट्रोल पंपाचे उद्घाटन सेवानिवृत्त अपर जिल्हाधिकारी बी. एम. कांबळे यांच्या हस्ते संपन्न झाले आहे.

उद्घाटन प्रसंगी कावळगाव येथील यश पेट्रोल पंपाचे संचालक मोगलाजी सोनकांबळे यांनी सन २०२३ - २४ मध्ये अथक परिश्रमातून कावळगाव येथील डिझेल व पेट्रोल पंप हिंदुस्तान पेट्रोलियम कार्पोरेशन लिमिटेड यांच्याकडून मंजूर करून घेऊन अवघ्या दीड वर्षाच्या कालावधीमध्ये पेट्रोल पंपाच्या उभारणीसाठी लागणाऱ्या सर्व शासकीय परवाना व बांधकाम पूर्ण करून देगलूर-हाणेगाव,देगलूर-मुक्रमाबाद या मुख्य रस्त्यावर जवळपास दहा ते पंधरा किलोमीटर अंतरावर ग्रामीण भागात पेट्रोल पंप नसल्यामुळे वाहन व शेती यंत्रणेच्या फवारणीसाठी पेट्रोल डिझेलचा तुटवडा भासत होता हा तुटवडा भरून काढण्यासाठी शासनाने लांब पल्ल्याचा अंतर पाहून कावळगाव येथे हिंदुस्तान पेट्रोलियम कार्पोरेशन लिमिटेड कंपनीने मंजुरी देऊन यश पेट्रोल पंपाची उभारणी केली आहे. त्यासाठी नवीन यश या पेट्रोल पंपावरून पेट्रोल डिझेल घेऊन जावे असे सेवानिवृत्त अपर जिल्हाधिकारी बि. एम. कांबळे यांनी बोलले आहेत.


यावेळी सेवानिवृत्त मा.सह संचालक,लेखा व कोषागार उत्तम सोनकांबळे, गौतम कांबळे देगलूरकर, भिमराव भाटापुरकर, सुभाष गायकवाड, कैलास येसगे, नागनाथ वाडेकर, माजी उपसरपंच तथा ग्रा. पं. सदस्य जयपाल दावनगीरकर, माधव वाडेकर, से.नि.विस्तार अधिकारी (पं.स.) सुर्यवंशी, कावळगावचे सरपंच बाई, शेषेराव मोरे कुडलीकर, मिलींद कावळगावकर परिसरातील व गावातील प्रतिष्ठित नागरिक उपस्थित होते.

# बुलडाणा औद्योगिक प्रशिक्षण संस्थेला मिळाले ‘श्री जगदगुरू पलसिद्ध महास्वामीजी’चे पवित्र नाव

## साखरखेर्डा आणि परळी परिसरात आनंदोत्सव सिद्धचैतन्य शिवाचार्य महाराजांच्या प्रयत्नांना मिळाले यश

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**बीड । विजय रोडे**



बुलढाणा येथील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेला आता साखरखेर्डा येथील पूजनीय श्री जगद्गुरू पलसिद्ध महास्वामीजींचे पवित्र नाव देण्यात आले आहे. या ऐतिहासिक निर्णयामुळे संपूर्ण साखरखेर्डा आणि परळी परिसरात आनंदाचे वातावरण आहे. वीरशैव लिंगायत समाजाने केंद्र सरकार आणि संबंधित लोकप्रतिनिधींचे आभार मानत या निर्णयाचे जोरदार स्वागत केले आहे.

सिद्धचैतन्य शिवाचार्य महाराजांचे अथक योगदान साखरखेर्डा येथील सिद्धचैतन्य शिवाचार्य महाराजांनी या ऐतिहासिक निर्णयासाठी निर्णायक भूमिका बजावली. त्यांनी बुलडाणा जिल्ह्यातील आमदार आणि केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव यांच्यासह इतर लोकप्रतिनिधींशी सातत्याने संवाद साधला आणि हा निर्णय प्रत्यक्षात आणण्यासाठी प्रखर पाठपुरावा केला. त्यांच्या अथक प्रयत्नांमुळेच आज साखरखेर्ड्याला ही ऐतिहासिक भेट मिळाली आहे.

वीरशैव लिंगायत समाजाचा सन्मान आणि आनंद या नावकरणामुळे श्री जगदगुरू पलसिद्ध महास्वामीजींच्या महान कार्याचा गौरव झाला असून, लिंगायत समाजाचा धार्मिक आणि सांस्कृतिक सन्मान झाल्याची भावना व्यक्त होत आहे. परळीतील वीरशैव लिंगायत समाजाने या निर्णयाबद्दल केंद्र सरकारचे आणि मंत्री जाधव यांचे विशेष अभिनंदन केले आहे.

परस्पर सहकार्याने मिळवलेले ऐतिहासिक यश केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव यांच्यासह सर्व लोकप्रतिनिधींनी या नावकरणासाठी विशेष परिश्रम घेतले. त्यामुळे हा निर्णय संपूर्ण बुलडाणा जिल्ह्यासाठी आभिमानाचा क्षण ठरला आहे.

संस्थेला नवी ओळख, प्रगतीचा नवा अध्यायजगद्गुरू पलसिद्ध महास्वामीजींच्या नावाने ओळखल्या जाणाऱ्या या औद्योगिक प्रशिक्षण संस्थेला आता एक नवा गौरव प्राप्त झाला आहे. यामुळे संस्थेच्या विद्यार्थ्यांना प्रेरणा मिळेल, तर साखरखेर्डा परिसराच्या विकासाला नवे आयाम प्राप्त होतील, असा विश्वास व्यक्त होत आहे.

हा केवळ साखरखेर्ड्याचाच नव्हे, तर संपूर्ण बुलढाना जिल्ह्याचा व परळीकरांसाठी ऐतिहासिक आणि गौरवशाली क्षण आहे. हा निर्णय भावी पिढ्यांसाठी आदर्श ठरेल, अशा शब्दांत समाजबांधवांनी आनंद व्यक्त केला आहे.

# वैजनाथ महाराज मठपती यांचा जीवन गौरव पुरस्काराने सन्मान

## मान्यवरांच्या उपस्थितीत शानदार सोहळ्यात प्रदान

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**उस्माननगर । गणेश लोखंडे**



कै. नागोराव गणपतराव पांडे लाठकर व कै. आनंदीबाई पांडे लाठकर यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ दरवर्षी दिला जाणारा कै.ना. ग.पांडे लाठकर वैद्यकीय ट्रस्ट नांदेड व समता माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने दरवर्षी दिला जाणारा जीवन गौरव पुरस्कार २०२४ हा पुरस्कार उस्माननगर येथील मनमिळाऊ स्वभावाचे व पंचक्रोशीत ओळखले जाणारे व्यक्तीमत्व वैजनाथ गुंडप्पा मठपती महाराज व सौ.सुमनबाई यांच्या कार्याची दखल घेऊन पांडे लाठकर ट्रस्टच्या वतीने शाळेचे माजी मुख्याध्यापक श्यामसुंदरराव जहागीरदार गुरूजी यांच्या हस्ते सपत्नीक प्रशस्तीपत्र , स्मृतिचिन्ह, आहेर भेट देऊन जीवनगौरव पुरस्काराने गौरविण्यात आले.यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे माजी मुख्याध्यापक श्यामसुंदरराव जहागीरदार गुरूजी होते.

प्रमुख पाहुणे म्हणून नांदेड न्यायालयांचे ड अर्धापुरकर , वैद्यकीय ट्रस्टचे अध्यक्ष भालचंद्र लाठकर, शाळेचे मुख्याध्यापक जी.सोनवणे , जीवन गौरव पुरस्कार प्राप्त वैजनाथ महाराज व सौ.सुमनबाई मठपती , तुकाराम वारकड गुरूजी , प्रभाकर मठपती ,सदाशिव मठपती , संजय वारकड ,प्रदीप देशमुख , पत्रकार संघाचे अध्यक्ष गणेश लोखंडे, देविदास डांगे , गोविंद बोदेमवाड, बी.जी.कांबळे , यांच्या सह अनेक मान्यवर उपस्थित होते. सर्वप्रथम कै.श्रीमती आनंदीबाई पांडे , कै.भास्कर ना.पांडे , कै. शैलाजा भा.पांडे , कै.नागोराव पांडे लाठकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून दिपप्रज्वलन पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. त्यानंतर कार्यक्रमांचे प्रास्ताविक भालचंद्र लाठकर यांनी केले. दरवर्षी वैद्यकीय ट्रस्टच्या माध्यमातून गरजू रुग्णांना आर्थिक मदत दिली जाते. त्याचबरोबर शाळा स्तरावर विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळावा म्हणून कै .शैलाजा भालचंद्र पांडे यांच्या स्मृतिप्रित्यर्थ वकृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. व यशस्वी विद्यार्थ्यांचे स्मृतिचिन्ह व प्रशस्तीपत्र देऊन गौरव करण्यात आला. यावेळी प्रथमच विशेष गौरव पुरस्काराचे मानकरी गावातील देशपांडे परिवारातील ज्येष्ठ असलेले,व समता शिक्षण प्रसारक मंडळ चे अध्यक्ष पुरुषोत्तमराव देशपांडे गुरुजी यांना देण्यात आला. यावेळी वारकड गुरूजी प्रभाकर मठपती, यांनी आपले मनोगत व्यक्त केले. यावेळी वैजनाथ मठपती महाराज यांना कै. भास्कर नागोराव लाठकर यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ दरवर्षी दिला जाणारा जीवन गौरव पुरस्कार २०२४ चा प्रशस्तीपत्र स्मृतिचिन्ह व वस्त्र आहेर देवून सपत्नीक गौरविण्यात आले. पुरस्कार मिळाल्याबद्दल पंचक्रोशीतील चाहत्यांनी , मित्र परिवारातून शुभेच्छा व अभिनंदन होत आहे सदरील कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.डॉ. अरविंद कुलकर्णी यांनी केले तर आभार राजीव अंबेकर यांनी मानले. सामुहिक राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

# आसवनी प्रकल्पांचे मल्टिफीड मध्ये रूपांतर केल्यास वर्षभर इथेनॉलचे उत्पादन शक्य-हर्षवर्धन पाटील

## पुणे येथे हर्षवर्धन पाटील यांच्या अध्यक्षतेखाली साखर संकुलमध्ये बैठक

## देशभरातील अधिकारी व तज्ज्ञांची बैठकीस उपस्थिती



पुणे येथे साखर संकुलमध्ये हर्षवर्धन पाटील यांच्या अध्यक्षतेखाली देशभरातील अधिकारी व तज्ज्ञांची इथेनॉल उत्पादन वाढीसाठी बैठक झाली.

### राष्ट्रीय साखर कारखाना महासंघाचा पुढाकार-हर्षवर्धन पाटील

**आसवनी प्रकल्पांच्या श्रेणीत सुधारणा करणेसाठी अर्थसहाय्य मिळावे यासाठी राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना महासंघाने पुढाकार घेतला आहे. भारत सरकारकडून यास चांगला प्रतिसाद मिळत आहे. राष्ट्रीय सहकारी विकास निगमने (एन.सी.डी.सी.) यासाठी व्याज सवलतीत मुदत कर्ज देण्याचे मान्य केले आहे, अशी माहितीही एन.सी.डी.सी.चे संचालक असलेले राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना महासंघाचे अध्यक्ष हर्षवर्धन पाटील यांनी दिली.**

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**इंदापूर । बबनराव धायतोंडे**

आगामी काळात इथेनॉलचे उत्पादन हे धान्याचा वापर करून वर्षभर घेता येणार आहे, त्याचा आर्थिक फायदा कारखान्यांना होणार आहे.त्यासाठी साखर कारखान्यांनी सध्याच्या आसवनी प्रकल्पांचे मल्टिफीड मध्ये रूपांतर केल्यास वर्षभर इथेनॉलचे उत्पादन घेणे शक्य होणार आहे,असे प्रतिपादन राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना महासंघाचे अध्यक्ष,माजी मंत्री हर्षवर्धन पाटील यांनी पुणे येथे शुक्रवारी (दि.१७) केले.

पुणे येथील साखर संकुलमध्ये देशातील इथेनॉल उत्पादन वाढीसाठी कोणती पाऊले उचलावीत यावर विचार करणेसाठी देशभरातील सहकार क्षेत्रात काम करणारे अधिकारी व तज्ज्ञांची बैठक राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना महासंघाचे अध्यक्ष हर्षवर्धन पाटील यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली.

या बैठकीस राज्याचे साखर आयुक्त डॉ.कुणाल खेमनार,अन्न व सार्वजनिक वितरण विभागाचे उपसचिव सुरेशकुमार नायक,केंद्रीय सहकारीता मंत्रालयाचे संचालक डी.के.वर्मा,एन.सी.डी.सी.चे संचालक गिरीराज अग्निहोत्री,राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना महासंघाचे व्यवस्थापकीय संचालक,देशभरातील सहकारी साखर कारखान्यांचे कार्यकारी संचालक,राज्य साखर संघांचे व्यवस्थापकीय संचालक आदी मान्यवर उपस्थित होते.हर्षवर्धन पाटील पुढे म्हणाले, इथेनॉल उत्पादनास गती यावी यासाठी राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना महासंघ नवी दिल्ली,केंद्रीय सहकार मंत्रालय,अन्न मंत्रालय आणि पेट्रोलियम मंत्रालय हे संयुक्तपणे कार्यरत आहेत. देशातील साखर कारखान्यांचे गळीत हंगाम सुमारे मार्च-एप्रिल पर्यंत चालतात. मात्र त्यानंतर इथेनॉलचे उत्पादन चालू ठेवायचे असेल तर ते धान्यावर चालवावे लागणार आहे.मका हे कमी पाण्यात व वर्षातील सर्व तिन्ही हंगामात येणारे पीक आहे.सहकार क्षेत्राला आर्थिकदृष्ट्या बळकट करण्यासाठी केंद्रीय सहकारिता मंत्रालयाने आसवनी प्रकल्पांच्या श्रेणीत सुधारणा करण्याचा आणि त्याद्वारे अन्न-धान्य विशेषत मक्यापासून इथेनॉलचे उत्पादन घेतल्यास इथेनॉल प्रकल्प वर्षभर चालतील आणि त्यातून कारखान्यांना आर्थिक स्थर्य प्राप्त होण्यास मदत मिळेल,असे त्यांनी सांगितले.देशातील ऑइल कंपन्या याबाबत साखर कारखान्यांशी दीर्घ मुदतीचे करार करण्याबाबत अनुकूल आहेत.तसेच उत्पादित इथेनॉलची खरेदी सहकारी आसवनींकडून प्रथम प्राधान्याने करण्याचे आदेश देण्यात आले आहेत, अशी माहितीही राष्ट्रीय साखर कारखाना महासंघाचे अध्यक्ष हर्षवर्धन पाटील यांनी यावेळी दिली.

# ग्रंथासह शांत,आनंदी,वैश्विक व्हा-प्रा.डॉ.विठ्ठल जायभाये

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**सोनपेठ । प्रतिनिधी**




येथील कै.रमेश वरपूडकर महाविद्यालयात ग्रंथालय विभागाच्या वतीने वाचन संकल्प महाराष्ट्राचा अंतर्गत प्रा.डॉ.विठ्ठल जायभाये यांचे व्याख्यान संपन्न झाले. वाचन हा मानवी जीवनाचा स्थायीभाव असून प्रत्येकाने दररोज वेळ काढून अनमोल ग्रंथांचे वाचन केले पाहिजे. सर्वांगीण व्यक्तीमत्व घडविण्यासाठी, मानवी जीवनाचे सार्थक करण्यासाठी आणि स्वतःसह समाजात सकारात्मक बदल घडविण्यासाठी तरुणांनी वाचन करावे. वाचन हेच आमुलाग्र जीवन बदलाचे खरे साधन असून ग्रंथ हेच खरे मित्र आहेत असे विचार प्रा.डॉ.विठ्ठल खंडूजी जायभाये यांनी वाचन संकल्प महाराष्ट्राचा या उपक्रमांतर्गत व्याख्यानात बोलताना व्यक्त केले. यावेळी व्यासपीठावर खट-उ समन्वयक डॉ.मुकुंदराज पाटील, डॉ.बापूराव आंधळे, डॉ.संतोष रणखांब यांची प्रमुख उपस्थिती होती. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.वसंत सातपुते होते. स्वतःच्या लायब्ररीतील २५ ते ३० पुस्तके प्रत्यक्ष दाखवताना डॉ.जायभाये यांनी वाचनाचे महत्त्व अनेक उदाहरण व दाखले देऊन स्पष्ट केले. ते पुढे म्हणाले की, वाचनामुळेच माणसाची विवेकशक्ती, सर्जनशीलता, कल्पनाशक्ती, प्रतिभा, आचार-विचार यात आमूलाग्र बदल होऊन सर्वार्थाने माणसाचा बौद्धिक आणि मानसिक विकास होतो. स्वतःच्या अस्तित्वाची जाणीव होण्यासाठी तरुणाईने मोबाईलच्या विळख्यातून बाहेर पडून पुस्तकांच्या विश्वात रममाण व्हावे. यावेळी नवीन पिढीविषयी चिंता व्यक्त करताना या अनमोल ग्रंथासह शांत, आनंदी, वैश्विक व्हा असा मोलाचा संदेश दिला. सामूहिक वाचन कार्यक्रमानंतर प्राचार्य डॉ.वसंत सातपुते सरांनी अध्यक्षीय समारोपात वाचन संस्कृती वृद्धिंगत करण्याचे आवाहन केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक ग्रंथपाल डॉ.अनंत सरकाळे यांनी तर आभार डॉ.अंगद फाजगे यांनी मानले. सदर कार्यक्रमास प्रा.सखाराम कदम, प्रा.सतीश वाघमारे, प्रा.पवार सर, प्रा.भास्कर मगर, प्रा.संतोष वडकर, प्रा.राहुल मांडे, प्रा.अर्जुन मोरे, श्री नितीन नरवाडे, श्री संतुक परळकर, श्री दत्ता सोनटक्के यांच्यासह महाविद्यालयातील विविध विभागाचे प्राध्यापक, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# राष्ट्रपती श्रीमती द्रोपदी मुर्मू यांनी केले भारतीय खेळाडूना सर्वोच्च अवॉर्डने सन्मानित

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**मुंबई । संदीप खरात**



१७/०१/२०२५ रोजी राष्ट्रपती भवन नवी दिल्ली इथे आयोजित कार्यक्रमात खेल रत्न पुरस्कार समारोह कार्यक्रमात राष्ट्रपती श्रीमती द्रोपदी मुर्मू यांनी उत्कृष्ट निशानेबाज अशी ओळख असलेली मनू भाकर यांना व चेस चॅम्पियन डी गुकेश यांना मेजर ध्यानचंद्र खेळ रत्न अवॉर्ड २०२४ साठी पुरस्कार देऊन नामांकित केले तसेच या व्यतिरिक्त भारतीय पुरुष हॉकी गेमचे कप्तान हरमनप्रीत सिंह यांना सन्मान दिला व पैरा ऍथलेट साठी प्रवीण कुमार यांना खेल क्षेत्रात योगदानासाठी नीवडले या सर्वांना अवॉर्ड देऊन गौरन्वित केले या व्यतिरिक्त एकूण ३४ खिलाडी यांना अर्जुन पुरस्कार ने सन्मानित केले श्रीमती मनु भाकर यांनी २०२४ मध्ये पेरिन ऑलिंपिक मध्ये दोन ब्रॉन्झ मेडल जिंकले होते ज्यामध्ये एक मेडल सिंगल वुमन दहा मीटर पीस्टल इवेट मध्ये जिंकले होते त्यानंतर दुसरा अवॉर्ड डी गुकेश यांना सर्वात कमी वयाचे वर्ल्ड चॅम्पियन म्हणून गौरव प्राप्त केला डी ०गुकेश यांनी चीनचे ग्रँडमास्टर डिंग लिरेन यांना हरवून ऐतिहासिक विजय आपल्या नावावर केला विजय संपादन करतेवेळी डी गुकेश तेव्हा फक्त अठरा वर्षे होते या कमी वयात वर्ल्ड चॅम्पियन बनण्याचा गौरव प्राप्त केला पुरुष भारतीय हॉकी टीमचे कप्तान हर्मन प्रीत सिंग यांनी २०२४ मध्ये पॅरिस ओलंपिक मध्ये ब्रॉन्झ मेडल जिंकून भारतीय टीमचा गौरव वाढवला होता तसेच हाय जम्पर प्रवीण कुमार यांनी २०२४ पॅरिस पॅरालिंपिक मध्ये गोल्ड मेडल सुद्धा आपल्या नावावर केले याव्यतिरिक्त टोक्यो पॅरामी मध्ये प्रवीण कुमारने सिल्वर मेडल वरती गौरव प्राप्त केला,,,,!

# नगरपरिषदेच्या वतीने घरघर संविधान वाटप करणार मुख्याधिकारी-निलम कांबळे




■ लोकनेता न्यूज नेटवर्क


**उमरी । महेश पडोळे**

नगरपरिषद उमरी यांच्यामार्फत संविधान अमृत महोत्सव अंतर्गत सन २०२४-२५ पासून 'घर घर संविधान कार्यक्रम ' साजरा करतात येणारं असल्याची माहिती उमरी नगरपरिषदेचे मुख्याधिकारी निलम कांबळे यांनी दिले. संविधान वाटपाचे औचित्य साधून दिनांक २१ जानेवारी २०२५ रोजी सकाळी ११ वाजता विद्यार्थिनी व महिलांकरिता भारतीय राज्यघटनेवर , प्रजासत्ताक दिनावर ,भारतीय स्वातंत्र्यलढ्यावर आधारित रांगोळी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या विजयी स्पर्धकांना प्रथम पारितोषिक २१०० रुपये रोख,तर द्वितीय पारितोषिक ११०० रुपये रोख, तसेच तृतीय पारितोषिक ५०० रुपये रोख असे बक्षीस ठेवण्यात आलेले आहे तरी जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी ,महिलांनी या स्पर्धकांनी यात सहभाग नोंदवावा व स्पर्धकांनी आपल्या नावाची नोंद नगरपरिषद कार्यालयात करावी, असे आवाहन मुख्याधिकारी नीलम कांबळे यांच्यावतीने करण्यात आलेले आहे.

# जगद्गुरु नरेंद्र महाराज संप्रदायाच्या वतीने रक्त दान शिबिराचे आयोजन

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**कंधार । धोंडीबा मुंडे**



अनंत श्री विभूषित जगद्गुरु रामानंदाचार्य श्री स्वामी नरेंद्र महाराज यांच्या प्रेरणेने स्व स्वरूप संप्रदाय कंधार च्या वतीने दि.१९ जानेवारी रोजी कंधार येथे रक्तादान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

जगद्गुरु नरेंद्राचार्य महाराज यांच्या स्व स्वरूप संप्रदाय च्या वतीने विविध सामाजिक उपक्रम वेळोवेळी राबवले जातात,गरजू महिलांना शिलाई मशीन,शेतकऱ्यांना शेतीची अवजारे,अपंगांना कृत्रिम अवयव, व रुग्णसेवेसाठी म्बुलन्स इत्यादी सामाजिक उपक्रमाद्वारे गरजूंना मदत केली जाते त्याचप्रमाणे नरेंद्र महाराज संप्रदायाच्या वतीने दरवर्षी रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात येते यावर्षी १९ जानेवारी रोजी श्री बालाजी मंदिर भवानी नगर कंधार येथे रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे,या रक्तदान शिबिरात सर्व रक्तदात्यांनी सहभागी व्हावे असे आव्हान स्व-स्वरूप संप्रदायाचे कैलास जाधव,शरद बामणे, साईनाथ व्यास, व राजेंद्र वाघमारे यांनी केले आहे,

# शक्तीपीठ महामार्ग तात्काळ रद्द करावा तिरुपती (पप्पू) पाटील कोंढेकर



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**मालेगाव । संदीप कदम**

शक्तिपीठ महामार्ग तात्काळ रद्द करण्यात यावा अशी मागणी तिरूपती (पप्पू) पाटील कोंडेकर यांनी केली आहे तसेच आंदोलनाचा इशारा दिला आहे.

देशात आणि राज्यात रस्त्यांचे विस्तत जाळे असताना देखील केवळ कंत्राटदारांना पोसण्यासाठी आणि त्याबरोबरच महाराष्ट्रातील शेतकऱ्यांचं भविष्य देशोधडीला लावणारा शक्तीपीठ महामार्ग या सत्ताधारी सरकारकडून तातडीने रद्द करण्यात यावा यासाठी आज मालेगाव व परिसरातील शेतकऱ्यांनी आंदोलन केले या शक्तीपीठ महामार्गामुळे हजारो शेतकर्यांचे होणारे नुकसान आणि तरुण वर्गाच्या भविष्यावर होणारे दुष्परिणाम लक्षात घेऊन शासनाने लवकरात लवकर हा शक्तीपीठ महामार्ग रद्द करावा अन्यथा येणाऱ्या काळात शेतकरी आणि महाराष्ट्रातील तरुण पिढीच्या हितासाठी रस्त्यावर उतरून आंदोलन करण्याचा इशाराही देण्यात आला...!

हे पत्रक,मालक,मुद्रक, प्रकाशक संपादक ज्ञानेश्वर भाऊसाहेब मुंढे यांनी न्यू गीता प्रिंटिंग प्रेस मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ येथे छापून दैनिक लोकनेता कार्यालय हो.नं ५०,मेन रोड मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. मो.नं ८४५९९७७९०४

This Newspaper is printed by owner, printer, publisher editor Dyaneshwar Bhausaheb Mundhe at New Geeta Printing Press Mirkala Ta Gevrai District Beed 431127 and published at Dainik Lokneta Office Ho.No. 50, Main Road Mirakala Ta Gevarai District Beed 431127 (Maharashtra) Mo no 84599 77904